**वानप्रस्थात...**



अंतर्मनांच्या पाचोळयात
पेट घेऊ पाहातात विचारांची कस्तणं
साकारतात गतायुष्यातील भूतं...

आठवतं मिसरूड फुटलेलं
पोरसवदा वाढतं वय
सर्वांगाला उत्क्रांत करणारं
चंद्राच्या अंगणात
तारकांची पारिजातकं वेंचणारं
पाहिले त्या यौवनात
उगवणारे सूर्योदय
आणि रंगांच्या मैफलीत
डुबणारे सूर्यास्त...

तो मोहरलेला मोसम होता
प्राशनाच्या पेल्यातील
प्रणयाचा घोट होता...
तेव्हा भावनेची गलबतं
स्वप्नांची क्षितिजं शोधत
किन-याला दीपस्तंभा
रात्रभर जागे ठेवत...

अजुनी ना विसरलो
बरंबुरं जे मी केलं
आठवांच्या अस्थींवर
मना का मी चेतविलं?...